आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२८ जून २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नीट परीक्षा प्रकरणी चर्चेची मागणी करत संसदेत विरोधकांचा गदारोळ, लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- शेतकरी, महिला, युवा, अल्पसंख्याकांसाठी विविध सवलती जाहीर करणारा महाराष्ट्राचा चालू आर्थिक वर्षाचा अतिरीक्त अर्थसंकल्प विधिमंडळात सादर

- झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची जामीनावर कारागृहातून सुटका

- महिला क्रिकेटमध्ये, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी सामन्यात पहिल्या दिवशी भारताच्या विक्रमी ५२५ धावा  / स्मृती मंधाना आणि शेफाली वर्मा यांचे भागीदारी, जलद शतक आणि द्विशतकाचे विक्रम

**आणि**

- टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात उद्या भारताची दक्षिण आफ्रिकेशी लढत

**<><><><><>**

वैद्यकीय  प्रवेश परीक्षा - नीट मधल्या गैरप्रकारांविषयी चर्चेची मागणी करत विरोधी पक्षसदस्यांनी गदारोळ केल्यामुळे, आज लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावर आज चर्चा होणार होती.

मात्र लोकसभेत आजच्या दिवसाचं कामकाज सुरु होताच वैद्यकीय प्रवेश परीक्षा-नीट प्रकरणी चर्चा करण्याची तसंच शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांनी केली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची दखल घेतली जात असल्याचा संदेश या चर्चेद्वारे द्यायचा असल्याचं विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांनी सांगितलं. काँग्रेस, द्रमुक, तृणमूल काँग्रेस, तसंच समाजवादी पार्टीच्या खासदारांनी सभापतींसमोरच्या मोकळ्या जागेत जाऊन घोषणा दिल्या. आभारप्रस्तावावरची चर्चा झाल्यावर हा मुद्दा उपस्थित करावा, आणि सभागृहाचं कामकाज सुरळीत होऊ द्यावं, असं सभापती ओम बिरला यांनी सदस्यांना सांगितलं. आभारप्रस्तावावरची चर्चा नियोजित असताना इतर मुद्द्यांवर चर्चा घेण्याची प्रथा नाही, असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. परंतु गोंधळ चालूच राहिला आणि सभापतींनी कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं.

राज्यसभेतही नीट परीक्षेच्या मुद्द्यावरुन गदारोळ झाल्यामुळे कामकाज एकदा १२ वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, आणि आम आदमी पार्टीच्या सदस्यांनी सरकारचा निषेध करणाऱ्या घोषणा दिल्या. निषेध चालू असतानाच काँग्रेसच्या सदस्य फूलो देवी नेताम भोवळ येऊन पडल्या. त्यांना तातडीनं रुग्णालयात नेण्यात आलं, आणि अडीच वाजेपर्यंत कामकाज तहकूब करण्यात आलं. त्यानंतर सर्व विरोधी पक्ष सदस्यांनी सभात्याग केला. त्यानंतर कामकाज पुन्हा सुरु झाल्यावर आभार प्रस्तावावर चर्चा सुरु झाली.

चर्चेदरम्यान, भाजपा सदस्य सुधांशु त्रिवेदी यांनी गेल्या १० वर्षात केंद्रसरकारने केलेल्या कामगिरीचा आढावा घेतला. ग्रेट ब्रिटनला मागे टाकून भारत जगातली पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला असल्याचा उल्लेख त्यांनी केला. काँग्रेस संविधानाची हेळसांड करीत असल्याची टीका भाजपा खासदार राकेश सिन्हा यांनी केली. महाराष्ट्रातले राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनीही चर्चेत भाग घेतला. संविधानाचं कलम ३७० रद्द केल्याबद्दल वाय एस आर काँग्रेसचे गोला बाबू राव यांनी सरकारची प्रशंसा केली. आज दोन्ही सभागृहांमध्ये दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

शेतकरी, महिला, युवा, अल्पसंख्याकांसाठी विविध सवलती जाहीर करणारा राज्याचा चालू आर्थिक वर्षाचा अतिरीक्त अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. हा त्यांचा दहावा अर्थसंकल्प आहे. विधानपरिषदेत मंत्री दीपक केसरकर यांनी हा अर्थसंकल्प सादर केला.

पेट्रोल आणि डिझेलवरचा मूल्यवर्धित कर राज्यभरात एकसमान करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी आज केली. त्यानुसार मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई महापालिका क्षेत्रात डिझेलवरचा व्हॅट सध्याच्या २४ टक्क्यांवरुन २१ टक्के प्रस्तावित केला आहे. यामुळं डिझेल लीटरमागे २ रुपये ७ पैशांनी स्वस्त होईल. तर पेट्रोलवरचा व्हॅट २६ टक्क्यांवरुन कमी करुन २५ टक्के करणे प्रस्तावित आहे. यामुळं पेट्रोल लिटरमागे ६५ पैसे स्वस्त होईल.

एकूण ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांची तरतूद अजित पवार यांनी या अर्थसंकल्पात केली आहे. महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५14 कोटी रुपये अंदाजित करण्यात आला आहे. तर २० हजार ५1 कोटी रुपयांची महसुली तूट आणि 1 लाख १० हजार ३५५ कोटी रुपयांची राजकोषीय तूट आहे.

**<><><><><>**

बहुचर्चित, “मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण” योजनेची घोषणा आजच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी केली. या अंतर्गत २१ ते ६० वर्ष वयोगटातल्या पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये आर्थिक मदत दिली जाणार आहे. यासाठी एकूण ४६ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. राज्यातल्या अडीच कोटींहून अधिक महिलांना याचा लाभ होण्याची शक्यता आहे. प्रत्येक घरामागे ३ गॅस सिलिंडर मोफत देणाऱ्या मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेचीही घोषणा अजित पवार यांनी आज केली. ५२ लाखांहून अधिक कुटुंबांना याचा लाभ होईल.

युवकांना प्रत्यक्ष कामाचं प्रशिक्षण मिळावं, यासाठी ‘मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने’ची घोषणा या अर्थसंकल्पात झाली. याअंतर्गत दहा लाख युवकांना वर्षभर कामाचं प्रशिक्षण दिलं जाईल आणि त्यासाठी दरमहा दहा हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन राज्य सरकार देईल.

शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी सरकारनं मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेची घोषणा अर्थसंकल्पात केली. यात ४४ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या साडे ७ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णत: मोफत वीज पुरवली जाईल..

गाव तेथं गोदाम योजना सरकारनं जाहीर केलीय. यात पहिल्या टप्प्यात १०० नवीन गोदामांचं बांधकाम आणि दुरुस्ती केली जाईल. दिव्यांग व्यक्तींसाठी ‘धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना’ सरकारनं जाहीर केलीय. त्यात पहिल्या टप्प्यात ३४ हजार ४०० घरं बांधली जाणार आहेत.

वारकऱ्यांसाठी ‘मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ’ स्थापन करण्याची घोषणा आजच्या अर्थसंकल्पात केली आहे. यातून किर्तनकार, वारकरी, भजनीमंडळ यांना सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील. तसंच पालखी मार्गांचं व्यवस्थापन केलं जाईल, असं ते म्हणाले. पंढरपूर वारीला जागतिक नामांकन मिळावं यासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवणार असल्याची घोषणा त्यांनी केली. याशिवाय कोकणातली कातळशिल्पे, दहीहंडी उत्सव आणि गणेशोत्सवाचाही प्रस्ताव पाठवला जाईल. यावर्षीपासून वारीतल्या मुख्य पालख्यांतल्या दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपयांचे अर्थसाह्य सरकार देणार आहे.

**<><><><><>**

राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प हा सर्वसामान्यांचा अर्थसंकल्प असून महिला आणि बेरोजगारांना आर्थिक ताकद देण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.

केंद्राकडून राज्यांना मिळणाऱ्या कर हिश्श्यात वाढ होण्याची अपेक्षा असून अर्थसंकल्पात पर्यायांचा विचार केल्याचं अजित पवार यांनी यावेळी सांगितलं.

अतिशय प्रगतिशील, सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय असा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा क्रांतीकारक निर्णय घेत बळीराजाच्या कष्टाचा आदर आणि सन्मान या अर्थसंकल्पात केल्याचं मत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार **सुनील तटकरे** यांनी व्यक्त केलं.

तर, फसव्या योजनांची ठिगळं लावलेला खोकेसंकल्प अशी टीका विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. सरकारनं निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अर्थसंकल्पाच्या नावाखाली महायुतीचा निवडणूक जाहीरनामाच सादर केला आहे, असा आरोप त्यांनी केला.

हा अर्थसंकल्प आश्वासनांची अतिवृष्टी आणि थापांचा महापूर असून त्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी न देता त्यांची लूट करण्यात आली  आहे, अशी प्रतिक्रिया माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली.

**<><><><>**

झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना रांची  उच्च न्यायालयानं जामीन मंजुर केला. त्यानंतर बिरसा मुंडा कारागृहातून त्यांची सुटका करण्यात आली. भुखंड घोटाळ्याशी संबंधित मनी लॉण्ड्रींगच्या आरोपावरून ३१ जानेवारीला सक्त वसुली संचालनालयानं त्यांना अटक केली होती. न्यायमूर्ती रोंगोन मुख्योपाध्याय यांनी आज त्यांना नियमित जामीन मंजूर केला.

**<><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात आज चेन्नईत सुरु झालेल्या कसोटी सामन्यात भारतानं, पहिल्यांदाच, एका दिवसात ५०० पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम नोंदवला. भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर हिनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय

घेतला. स्मृती मंधानानं शतक, तर शेफाली वर्मानं द्विशतक झळकावलं. या दोघींनी पहिल्या गड्यासाठी २९२ धावांची भागिदारी केली. हाही एक विक्रम आहे. स्मृतीनं १४९, तर शेफालीनं २०५ धावा केल्या. शेफाली सर्वात जलद शतक करणारी महिला फलंदाज ठरली. तिनं ११३ चेंडूत शतक साकारलं. याआधी इंग्लंडच्या जॅन ब्रिटिननं १९८४ मधे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात १३७ चेंडूत शतक झळकावलं होतं.

**<><><><><>**

टी-२० विश्वचषक  क्रिकेट स्पर्धेत, गतविजेत्या इंग्लंडचा पराभव करुन भारतीय संघानं तिसऱ्यांदा अंतिम सामन्यात धडक मारली आहे. भारताचा गोलंदाज अक्षर पटेल सामनावीर ठरला. अंतिम सामना उद्या भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात रंगणार आहे.

**//<><><><><>//**